*नेहरू बाल पुस्तकालय*

# बांबूचे घर

नीरा जैन

अनुवाद

दीप्ती विद्येश नाशिककर

चित्रांकन

देबाशीष देब

nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

A House Of Bamboo-Marathi 12-10-2019.indd 1 17-12-2019 15:59:23

आगरताळा (त्रिपुरा) येथील लेखक/चित्रकार कार्यशाळेत मार्च 2008 मध्ये या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

ISBN 978 - 81-237-9010-7

पहिली आवृत्ती : 2019 (*शके* 1941)

© नीरा जैन

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

A House of Bamboo *(English Original)*
Bambooche Ghar *(Marathi)*

**₹ 40.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज–II,
वसंत कुंज, नवी दिल्ली- 110 070 यांनी प्रकाशित केले.

www.nbtindia.gov.in

nbt.india
एकः सूते सकलम्



''राहुल इकडे ये, आत्ताच्या आत्ता तुझा पसारा आवर,'' राहुलची आई म्हणाली.

nbt.india
एकः सूते सकलम्

A House Of Bamboo-Marathi 12-10-2019.indd 3 17-12-2019 15:59:23



‘‘नाही आई. मला नाही जायचे. मला इथेच दिल्लीत राहायचे आहे. मी जर गेलो ना, तर मला माझ्या मित्रांची, माझ्या छंदवर्गांची, मेट्रोतल्या प्रवासाची ... ह्या सगळ्यांची खूप आठवण येईल! तुला माहिती आहे ना माझे संगीताचे शिक्षक मला किती छान-छान गोष्टी सांगतात?’’



‘‘पण, राहुल तुझ्या बाबांची बदली झाली आहे. आपल्या सगळ्यांना आगरताळ्याला गेलंच पाहिजे,’’ आईने निग्रहाने सांगितले.

nbt.india एकः सूते सकलम्



राहुल गप्प बसला. शाळेच्या सहलींमध्ये मित्रांसोबत भेट दिलेल्या सगळ्या जागा त्याला आठवू लागल्या -- राजघाट, राष्ट्रपती भवन, लाल किल्ला ...

A House Of Bamboo-Marathi 12-10-2019.indd 6 17-12-2019 15:59:25



कुतूब मिनार, इंडिया गेट, आणि इतरही खूप काही. तो विचारात मग्न झाला आणि आपल्या मित्रांचा विचार करू लागला.

nbt.india एक: सूते सकलम्



‘‘राहुल उद्या सामानाचा ट्रक येणार आहे,’’ आईने जाहीर केले.

nbt.india
एकः सूते सकलम्



दुसऱ्या दिवशी सकाळच्या विमानाने ते सर्वजण त्रिपुरा येथील आगरताळा येथे पोहोचले.



"राहुल बघ, किती सुंदर दृष्य आहे," आई उत्साहाने म्हणाली.

nbt.india
एक: सूते सकलम्



राहुलचे लक्ष विचलित झाले आणि त्याने वर बघितले. ‘‘बांबूचे घर!’’ तो आनंदाने ओरडला.

A House Of Bamboo-Marathi 12-10-2019.indd 11 17-12-2019 15:59:29



nbt.india
एकः सूते सकलम्

‘‘आई बघ, इथले प्राणी थोडे वेगळेच आहेत आणि आकाशातले इतके तारे मी यापूर्वी दिल्लीत असताना कधीच बघितले नव्हते...’’ रात्री उशिरापर्यंत राहुल स्वतःशीच बोलत राहिला.



राहुल शाळेत जायला लागला. तो तिथे रमू लागला.

‘‘आई आज मला डब्यात अगदी छान जेवण दे. आम्ही शाळेतूनच आगरताळ्याला सहलीला जाणार आहोत.

एकः सूते सकलम्




आम्ही वेगवेगळ्या स्थळांना भेटी देणार आहोत, जसे की -- नीर महाल, उदयपूर मंदिर आणि भारत-बांगलादेश यांची सीमा.'' राहुल आनंदात होता.



राहुलने आता बसमधल्या एका मुलाबरोबर मैत्री करण्याचा प्रयत्न केला. तो मुलगा दुःखी दिसत होता.
''चल मित्रा, आपण भारत-बांगलादेश यांची सीमा आणि 'नो मॅन्स लॅन्ड' पाहू,'' राहुल म्हणाला.



‘‘नाही, मी खूप वेळा बघितली आहे,’’ तो उत्तरला.
‘‘का, काय झाले?’’ राहुलने चौकशी केली.
‘‘माझ्या वडिलांची बदली झाली....’’ त्याने उत्तर दिले.

एक: सूते सकलम्

nbt.india

एकः सूते सकलम्

Lasertypeset by Mac Script, Pune and printed at Infinity Advertising Solutions Pvt. Ltd., Faridabad



nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 40.00
ISBN 812379010-4
19200000
A House of Bamboo
*(Marathi)*

A House Of Bamboo-Marathi 12-10-2019.indd 18 17-12-2019 15:59:33



# बांबूचे घर

नीरा जैन

अनुवाद
दीप्ती विद्येश नाशिककर

चित्रांकन
देबाशीश देब